राज्यातील मोठया पाटबंधारे प्रकल्पातून गाळ व
गाळमिश्रित वाळू/रेती निष्कासनाबाबतचे धोरण.

# महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः मेरीना-२०१४/प्र.क्र.१८२/१४ लाक्षेवि (आस्था)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
तारीख : ०४ मे, २०१७.

वाचा : **शा.नि. महसूल व वन विभाग क्र. गौखनि/१०/प्र.क्र.४७/ख, दिनांक ९.९.२०१४.**

**प्रस्तावना**

राज्यात जून २०१५ अखेरपर्यंत पूर्णत: व अंशत: सिंचन क्षमता निर्माण झालेले ८६ मोठे, २५८ मध्यम व ३१०८ लघु असे एकूण ३४५२ प्रकल्प आहेत. पावसाळयात नदी, नाले तसेच ओढयांना येणाऱ्या पुरामुळे धरण क्षेत्रात पाण्याचा साठा जमा होतो. या पुरात पाण्याबरोबरच माती, दगड, गोटे, रेती असे अनेक पदार्थ वाहून येतात आणि हळूहळू धरणाच्या साठवणूक क्षमतेत घट होते. धरणाच्या वयाबरोबरच जल साठवणुकीत येणारी घट ही वाढत असून अनेक धरणांमध्ये ही घट विलक्षणीयरित्या दिसून येत आहे. धरणाच्या साठवणुकीच्या क्षमतेत घट झाल्यामुळे त्याचा सिंचन क्षमतेवर तथा वीजनिर्मितीवर विपरीत परिणाम होतो. राज्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये पेयजल, कृषि, उद्योग, वीजनिर्मिती क्षेत्राचे अनन्यसाधारण महत्व आहे. पेयजल, कृषि, उद्योग व वीजनिर्मितीसाठी भविष्यात पाण्याची नितांत आवश्यकता आहे. तसेच वाढत्या लोकसंख्येबरोबर पाण्याची मागणी सर्वच क्षेत्रांकडून वाढणार आहे. भविष्यातील पाण्याची आव्हाने विचारात घेऊन, त्याचे सुनियोजित व्यवस्थापन करणे हे मोठे आव्हान राहणार आहे. जल साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी भविष्यात वेगवेगळया स्वरुपाच्या अनेक उपाययोजना कराव्या लागणार आहेत. त्याचा एक भाग म्हणून राज्यातील मोठे, मध्यम व लघु सिंचन प्रकल्पात साचलेला गाळ व गाळमिश्रित वाळू/रेती निष्कासनाबाबतचे धोरण निश्चित करणे आवश्यक झाले आहे. यासंदर्भात महसूल व वन विभागाने यापूर्वी दिनांक ०९.०९.२०१४ च्या शासन निर्णयानुसार धोरण निर्गमित केले आहे.

राज्यातील सर्व पाटबंधारे प्रकल्प जलसंपदा विभागातंर्गत पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीत आहेत. पाटबंधारे विकास महामंडळांच्या कायदयातील कलम १८ नुसार पाटबंधारे महामंडळांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रकल्पांचे पूरनियंत्रण व लाभक्षेत्र विकासाच्या योजनांची आखणी, बांधकाम व सिंचन व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे.

धरणातील गाळमिश्रित वाळू/रेती काढून त्यांची पाणी साठवण क्षमता व सिंचन क्षमता अबाधीत ठेवणे आणि प्रकल्पाची कार्यक्षमता वाढविणे ही कामे लाभक्षेत्र विकासाशी संबंधित असल्याने पाटबंधारे विकास महामंडळांनी करणे अपेक्षित आहे. दिनांक ८.११.२०१६ च्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापनची जबाबदारी पाटबंधारे महामंडळाकडे वर्ग करण्यात आली आहे. राज्यातील पाटबंधारे प्रकल्पातून गाळ मिश्रित वाळू/रेती निष्कासनाच्या धोरणातून पाटबंधारे विकास महामंडळांना निधी मिळाल्यास पाटबंधारे प्रकल्पांच्या पुनर्स्थापनेसाठी कामे चांगल्या पध्दतीने करता येतील. सबब धरणातील गाळयुक्त रेती / वाळू निष्कासन करण्याचे काम संबंधित महामंडळामार्फत करण्याच्या अनुषंगाने महसूल व वन विभागाच्या दिनांक ९.९.२०१४ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय -

१.० राज्यातील मोठया धरणातील गाळ, गाळमिश्रित वाळू/रेती निष्कासनाची कार्यवाही जलसंपदा विभागाचे अखत्यारितील संबंधित पाटबंधारे विकास महामंडळामार्फत करावी व त्यामधून मिळणारा महसूल सिंचन प्रकल्पांच्या पुनर्स्थापनेच्या कामासाठी वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत महामंडळाने केलेल्या कार्यवाहीचा व मिळालेल्या उत्पन्नाचा वार्षिक आढावा जलसंपदा विभागाने घ्यावा. राज्यातील सर्वच प्रकल्पावर गाळ मिश्रित रेती निष्कासनाचे धोरण न राबवता प्रथम पाच मोठ्या प्रकल्पांची निवड करून या धोरणानुसार त्यातील गाळ निष्कासन करावे. तदनंतर या प्रक्रियेचा अनुभव घेऊन राज्यातील उर्वरित प्रकल्पातील गाळ मिश्रित वाळू/रेतीच्या निष्कासनाबाबतचे धोरण शासन निश्चित करेल.

२.० निष्कासित केलेला गाळ हा शेतक-यांना त्यांच्या स्वत:च्या शेतात टाकण्यासाठी स्वखर्चाने वाहतूक करून स्वामीत्व शुल्काची आकारणी न करता वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३.० मोठ्या प्रकल्पातील गाळ मिश्रित वाळू/रेतीच्या निष्कासनाच्या निविदेचा कालावधी १५ वर्षाचा असेल.

४.० धरणातील गाळ व गाळयुक्त रेती निष्कासनाच्या बदल्यामध्ये कंत्राटदाराने निष्कासित केलेल्या गाळ मिश्रित रेतीमधून वाळू/रेती वेगळी करून वाळू/रेती च्या परिमाणाएवढे स्वामीत्व शुल्क महसूल विभागाकडे प्रचलित दराने भरून कंत्राटदारास विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५.० सिंचन प्रकल्पातून गाळ व गाळ मिश्रीत रेती / वाळू निष्कासनाचे धोरण प्रामुख्याने मोठया सिंचन प्रकल्पांशी संबंधित आहे. या धोरणाच्या कक्षेतून लघु पाटबंधारे वगळण्यात आले आहेत. या प्रकल्पासंदर्भात प्रकरणनिहाय शासन स्तरावर निर्णय घेण्यात यावा.

६.० मेरीने निवड केलेल्या प्रायोगिक पाचही मोठया प्रकल्पातून गाळ व गाळ मिश्रित वाळूच्या निष्कासनासाठी एकाचवेळी प्रकल्पनिहाय ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. ई-निविदाची कार्यपध्दती, कंत्राटाच्या अटी व शर्ती शासन मान्यतेने पाटबंधारे विकास महामंडळ यांनी निश्चित कराव्यात. यामध्ये खालील प्रमुख बाबींचा समावेश असेल.

अ) पाच मोठ्या प्रकल्पाच्या बाबतीत एकाचवेळी प्रकल्पनिहाय ई-निविदा प्रक्रिया राबविताना शासनाच्या मान्यतेने पाटबंधारे विकास महामंडळ निश्चित करेल अशा तांत्रिक व आर्थिक क्षमता असणाऱ्या ५ वर्षाचा अनुभव असलेल्या व गाळ मिश्रित रेती काढण्यासाठी आवश्यक सर्व यंत्रसामुग्री असणाऱ्या कंत्राटदाराची पूर्व अर्हतेनुसार पात्रता ठरविण्यात येईल.पूर्व अर्हतेमध्ये सहकारी संस्थांना प्राधान्य दिले जाईल. पूर्व अर्हतेमधील एकूण १०० गुणांमध्ये कमाल ३० गुण वित्तीय क्षमता ,कमाल ३० गुण अनुभव,कमाल २५ गुण यंत्रसामुग्रीकरिता असतील तर कमाल १५ गुण सहकारी संस्थांकरीता असतील. वित्तीय क्षमता, अनुभव व यंत्रसामुग्री या प्रत्येक घटकामध्ये किमान ५०% तसेच एकत्रितपणे किमान ७० गुण प्राप्त निविदाकारास ई-निविदेत भाग घेता येईल. सदर निविदेतील निविदाधारकाने भरावयाचा दर हा गाळयुक्त रेती /वाळू मधून वाळू /रेती वेगळी केल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या प्रती ब्रास रेती प्रमाणे असेल. निविदा धारकाने भरावयाचा हा दर स्वामित्व शुल्क वगळून असेल. महसूल व वन विभागास अदा करावयाचे स्वामित्व शुल्क हे वेळोवेळीच्या महसूल व वन विभागाच्या धोरणानुसार कंत्राटदारास वाहतुकीपूर्वी अदा करावे लागेल. ई-निविदा प्रक्रियेत उच्चतम देकाराची निविदा स्विकृत केली जाईल.

ब) न्यायालयीन आदेश, पर्यावरण विभागाची मनाई, नैसर्गिक आपत्ती व जनहितार्थ प्रयोजन व धरणाची सुरक्षितता इत्यादीमुळे कंत्राट स्थगित झाल्यास अथवा रद्द झाल्यास कंत्राटदारास कुठलीही नुकसान भरपाई मिळणार नाही किंवा कंत्राटास मुदतवाढ मिळणार नाही, अशी तरतूद अंतिम करारामध्ये करावी.

क) गाळ मिश्रित वाळू/रेती प्रक्रिया केल्यानंतर प्राप्त होणारी वाळू/रेती याच्या सुरक्षेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. "वाळू चोरीस प्रतिबंध होईल अशा पद्धतीने महामंडळाने निश्चित केलेल्या ठिकाणी निश्चित केलेल्या संख्यने, कंत्राटदारास त्याचे खर्चातून CCTV कॅमेरे बसविणे बंधनकारक राहील.

ड) संपादीत क्षेत्रातून निष्कासित केलेला गाळ व गाळ मिश्रीत वाळूची साठवणूक तथा प्रक्रिया करणेसाठीची जागा ठेकेदाराने निश्चित केल्यावर ती जलसंपदा विभागाच्या मालकीची असल्यास सदर जागा जलसंपदा विभागाने कंत्राटदारास कंत्राटाच्या मुदतीपर्यंत वापरण्यास दयावी. खाजगी जागा असल्यास ती ठेकेदाराने स्वखर्चाने घ्यावी. कंत्राटदार सदर जागेवर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री व बांधकाम करु शकेल. कंत्राटदाराने गाळ व रेती वेगळी केल्यानंतर महामंडळाने ठरवलेल्या ठिकाणी गाळाची साठवणूक केली जाईल.

इ) निविदेमध्ये नमूद केलेल्या गाळ गाळयुक्त रेतीचे निष्कासन कंत्राटदाराने निविदा कालावधीमध्ये करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर नैसर्गिक जमिन पातळी खाली उत्खनन करता येणार नाही. जलाशयातून गाळ युक्त रेती मधून केवळ रेतीचेच निष्कासन करता येणार नाही. निष्कासन करताना गाळ व रेतीचे प्रमाण निविदेपूर्वी होते साधारणत: त्याच प्रमाणात (१० % कमी किंवा जास्त ) गाळ व रेतीचे निष्कासन करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. वेगळा करण्यात आलेला गाळ महामंडळ निश्चित करेल अशा ठिकाणी साठा केला पाहीजे किंवा शेतकरी लगेचच वाहतुक करावयास तयार असल्यास हा गाळ त्याचे वाहनात भरून देणे आवश्यक राहील. गाळाचा साठा केलेल्या ठिकाणाहून शेतक-यांनी स्वखर्चाने गाळाची वाहतूक करणे अपेक्षित आहे.शेतक-याने स्वखर्चाने गाळ न उचलल्यास महामंडळ निश्चित करेल अशा ठिकाणी गाळाची वाहतूक स्वखर्चाने करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. कंत्राटदारानी असे न केल्यास सदर गाळाची वाहतूक महामंडळाने करुन त्यावर येणारा संपूर्ण खर्च कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल. या गाळाची विल्हेवाट दरवर्षी दि.०१ जून पूर्वी करणे आवश्यक राहील.

ई) गाळ व गाळमिश्रित निष्कासनानंतर वेगळी केलेली वाळूची वाहतूक/साठा करण्यासाठी महसूल विभागाने निर्गमित केलेले प्रचलित आदेश लागू राहतील.

७.० निविदा प्रक्रिया:-

अ) निवड केलेल्या प्रकल्पातील गाळ मिश्रित वाळू/रेती निष्कासनाबाबतच्या निविदेच्या अटी व शर्ती शासनाच्या मान्यतेने पाटबंधारे विकास महामंडळानी निश्चित कराव्यात.

ब ) धरण/प्रकल्प क्षेत्रातून गाळ मिश्रित वाळू/रेती निष्कासन करताना धरण/प्रकल्पाची सुरक्षितता अत्यंत महत्वाची आहे. त्या धरण/प्रकल्पास कोणत्याही स्वरुपाची हानी पोहचणार नाही, धरणास हानी झाल्यास कंत्राटदारास महामंडळ ठरवेल अशा पध्दतीने स्वखर्चाने धरणाची दुरूस्ती करावी लागेल अथवा महामंडळ निश्चित करेल इतकी रक्कम अदा करावी लागेल. अशी अट निविदेत अंतर्भूत करण्यात यावी. तसेच कोणत्याही स्वरुपाची धरणास हानी उद्भवल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

क) धरण क्षेत्रातून गाळ मिश्रित वाळू/रेती निष्कासनासाठी वापरावयाची यांत्रिकी साधने निश्चित करुन त्या साधनाच्या वापराबद्दलची कार्यपध्दती मुख्य अभियंता, यांत्रिकी संघटना नाशिक यांच्या सहमतीने निश्चित करावी.

ड) गाळयुक्त रेती/वाळू मध्ये वाळूचे प्रमाण किती आहे याचे सर्वेक्षण, निविदा निश्चितीपूर्वी मेरी, मार्फत करण्यात येईल. निविदेत नमूद केलेल्या अंदाजित रेतीच्या परिमाणापेक्षा प्रत्यक्षात कमी रेती उपलब्ध् झाल्यास कंत्राटदारास अन्य कोणत्याही स्वरुपात कोणतीही रक्कम देय होणार नाही.

इ) मोठया जलाशयामध्ये गाळ काढण्याची प्रकिया सुरु झाल्यानंतर त्या ठिकाणाबाबत संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना मत्स्योत्पादनावर अनिष्ठ परिणाम न होण्याची उपाय योजना करणेबाबत कळविण्यात यावे.

७.१ गाळमिश्रित वाळू/रेती निष्कासन करताना धरणाची सुरक्षितता अबाधित रहावी आणि निष्कासन प्रक्रियेचे संनियंत्रण कार्यक्षमपणे करता यावे याद्दष्टीने निविदाधारकास त्याठिकाणी अन्य व्यक्ती किंवा संस्थेस उप ठेका / उप कंत्राट देण्याचे अधिकार राहणार नाहीत.

७.२ धरणक्षेत्रातून धरणाच्या भिंतीपासून वाळू/रेती निष्कासनासाठी अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांनी घालून दिलेल्या मर्यादेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. धरणाच्या सुरक्षिततेबाबत तडजोड करण्यात येऊ नये. अटी व शर्तीचे उल्लंघन होत असल्यास तात्काळ निष्कासन थांबवून सदर कंत्राट रद्द करण्यासाठी प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांनी महामंडळास सादर करावा.

७.३ वन राखीव क्षेत्र/प्राणी पक्षी अधिवास क्षेत्राबाबत :-

अ) ज्या धरण क्षेत्रात पक्षांचा अधिवास आहे तेथे त्यांचे संरक्षण होईल याची पूर्ण खबरदारी घेण्यात यावी.

ब) निष्कासन क्षेत्राच्या सभोवतालीच्या वनक्षेत्राचे पुन:स्थापन होईल त्याद्दष्टीने निष्कासन करावे, निष्कासन केलेले निरुपयोगी साहित्य वनक्षेत्रात टाकू नये.

७.४ कंत्राटदाराने अटी/शर्तीचे उल्लंघन केल्यास करावयाची कारवाई :-

कंत्राटदाराने मंजूर निविदेच्या चिन्हांकित केलेल्या एकूण क्षेत्राबाहेर गाळ/गाळमिश्रित वाळू/रेती निष्कासन केल्यास, तसेच जलसंपदा विभागाने निश्चित केलेल्या खोलीपेक्षा, क्षेत्रापेक्षा जास्त उत्खनन केल्यास सदर निष्कासन अवैध निष्कासन समजून त्याच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात यावी. तसेच त्याचा कंत्राट/परवाना रद्द करुन फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात यावी. तसेच अनामत रक्कम जप्त करण्यात यावी.

७.५ कंत्राटदारास कंत्राट दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरित करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा निविदा मंजूरीत भागीदारही घेता येणार नाही.

७.६ अवैध निष्कासन / वाहतुकीची प्रकरणे उघडकीस आल्यास अशा प्रकरणी संबंधित कंत्राटदार वाहनमालक-वाहनचालक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात यावी.प्रचलित नियमानुसार कारवाई करताना संबंधितांविरुध्द भारतीय दंड विधी संहिता कलम, ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करणे, वाहन जप्त करणे, अवैध निष्कासन केलेली वाळू जप्त करुन स्वामित्वधन व दंडाची रक्कम वसूल करण्याची कारवाई करण्यात यावी. तसेच वाळूचे अवैध निष्कासन वाहतूक इ. मुळे दंडात्मक कारवाई करताना महसूल / जलसंपदा अधिकारी/कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास व अशा ठिकाणी संघटीत गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटीत गुन्हेगारीविरुध्द "मोक्का" सारख्या अधिनियमान्वये कारवाई करण्याबद्दल सुध्दा विचार व्हावा.

७.७ गाळ / गाळमिश्रीत वाळू / रेती निष्कासन व वाहतुकीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी बारकोडींग केलेली पुस्तके वापरावीत.

७.८ यशस्वी निविदाधारकाने गाळमिश्रीत वाळू रेती निष्कासनासाठी धरण क्षेत्राचा ताबा घेतल्यानंतर वाहतूक करण्यापूर्वी ज्या वाहनातून वाहतूक करण्यात येणार आहे याबाबतची माहिती तहसिलदार /जिल्हाधिकारी यांना दिल्यानंतर त्या वाहनांची वाहन क्षमता विचारात घेवून त्या क्षमतेप्रमाणे बारकोडींग केलेले पासेस कंत्राटदारास देण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वाहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७.९ गाळमिश्रित वाळू/रेती निष्कासन व वाहतूक यासाठी वापरण्यात येणाऱ्या ड्रेझर्स, बोटी तसेच बार्ज यांचे नाव व नोंदणीकृत क्रमांक सुध्दा संबंधित कार्यकारी अभियंता यांना द्यावेत. संबंधित कार्यालयाने नोंदणीकृत असलेल्या बोट, ड्रेझर तसेच बार्जना परवानगी द्यावी. तसेच गाळमिश्रित वाळू निष्कासनासाठी किंवा वाहतुकीसाठी नोंदणी केलेल्या बोटी, बार्ज याचाच वापर केला जाईल याबद्दल दक्षता घ्यावी.

नोंदणी न केलेली बोट, ड्रेझर्स व बार्ज गाळमिश्रितवाळू निष्कासन करताना किंवा वाहतूक आढळून आल्यास त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०५०४१२२६१४२७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ई.सिं.चहल)
प्रधान सचिव (जलसंपदा)

**प्रत,**

१. मा.राज्यपालाचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.अध्यक्ष / उपाध्यक्ष , विधानसभा, विधानभवन, मुंबई
४. मा.अध्यक्ष / उपाध्यक्ष , विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
५. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
६. मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद,विधानभवन , मुंबई
७. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
९. महालेखापाल १/२ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
१०. प्रधान सचिव, वित्त विभाग, नियोजन विभाग, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, कृषी विभाग, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव (प्रकल्प समन्व्य) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१४. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक
१५. सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग

१६. सर्व विभागीय आयुक्त
१७. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९. उप सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२०. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग
२१. सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग
२२. अवर सचिव/ कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मंबुई
२३. निवड नस्ती.